# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**अत्यंत महत्त्वाचे**

जा.क्र.लेखा/२९/कावि/30 /२५
दि.२८/०१/२०२५

**परिपत्रक**

विषय : सन २०२४-२५ चे सुधारीत व सन २०२५-२६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत.
संदर्भ:- इकडील परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/२६८/२०२४ दि.०३/१०/२०२४

सन २०२४-२०२५ चे सुधारीत व सन २०२५-२०२६ चे मुळ अंदाजपत्रकाचे कामकाज सुरू करणेत आले असून अंतिम टप्प्यात आहे. मा.आयुक्त सो यांनी अंदाजपत्रक बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार भांडवली व महसुली ( किरकोळ दुरूस्ती ) खर्चाशी संबंधीत सर्व विभागांना लेखा विभागामार्फत वितरीत केलेल्या तरतूदींच्या मर्यादेत लेखाशिर्ष / कामनिहाय अंदाजपत्रकीय तरतूदी लेखा संगणक प्रणालीमध्ये दि.३१/०१/२०२५ पर्यंत सादर करणेकामी सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार सर्व संबंधित विभागांना सुचीत करणेत येते की, लेखा विभागामार्फत वितरीत केलेल्या तरतूदींच्या मर्यादेतच संबंधित विभागांनी लेखाशिर्ष / कामनिहाय अंदाजपत्रकीय तरतूदी लेखा संगणक प्रणालीमध्ये दि.३१/०१/२०२५ पर्यंत सादर कराव्यात. तसेच ज्या भांडवली कामांमध्ये Climate Budget संबंधीत घटक आहेत, त्या कामांची अचूक माहिती लेखा संगणक प्रणालीमध्ये दिलेल्या Climate Budget नमून्यामध्ये भरण्याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. तसेच नागरीकांच्या सहभागांतर्गत नागरीकांनी सुचविलेली कामांपैकी जी कामे पात्र झालेली आहेत त्या कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्याची कटाक्षाने दक्षता संबंधित विभागांनी घ्यावी. दि.३१/०१/२०२५ ही अंदाजपत्रक सादर करणेकरीता अंतिम तारीख असणार आहे, त्यानंतर अंदाजपत्रकामध्ये कोणताही बदल स्विकारला जाणार नाही. विभागांनी अंदाजपत्रकाची माहिती विलंबाने सादर केल्यामुळे अंदाजपत्रक मा.प्रशासक यांची मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी सादर करण्यास विलंब झाल्यास संबंधित विभाप्रमुखास जबाबदार धरणेत येईल. दि.०१/०२/२०२५ पासून लेखा विभागामार्फत अशीच देयके स्विकारली जातील ज्या कामांना सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात तरतूद आहे व सुधारीत अंदाजपत्रकामध्येही तरतूद ठेवणेत आलेली आहे. ज्या कामांना सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात तरतूद नाही परंतु सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतूद प्रस्तावित केलेली आहे, अशा कामांच्या देयकांची अदायगी अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने अंतिम मंजूरी दिल्यानंतर केली जातील. सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व सर्व संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

Pravin Jain

**( प्रविण जैन )**
**मुख लेखा व वित्त अधिकारी**
**तथा संचालक (वित्त)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी